DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. भारत सरकार, गृह मंत्रालय अधिसूचना क्र. No. 40-3/2020-DM-I(A) दि. 29 ऑगस्ट 2020.
5. भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांनी जाहिर केलेली SOP दि. 08.09.2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 30 सप्टेंबर 2020.
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 14 ऑक्टोबर 2020.
8. श्री. धनंजय जेवळीकर, जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांचे निवेदन दि. 16.10.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांक:- 23/10/2020.

**विषय:- लॉकडाऊन कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेची अधिकृत अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रे सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ 4 मध्ये नमूद भारत सरकार यांचे आदेशातील मुद्दा क्र. 1 (i) (d) नुसार दि. 21.09.2020 पासून व संदर्भ क्र. 7 मध्ये नमूद महाराष्ट्र शासन यांचे आदेशाच्या परिशिष्ट 2 मधील मुद्दा क्र. 4 (iii) नुसार दि. 15.10.2020 पासून कौशल्य व उद्योजकता विषयक प्रशिक्षण सुरु करणेस परवानगी दिलेली असून सदर प्रशिक्षण देताना घ्यावयाची काळजी व करावयाची कार्यवाही याबाबत संदर्भ क्र. 5 अन्वये प्रमाणित कार्यपद्धती (SOP) प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 अन्वये श्री. धनंजय जेवळीकर, जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांनी उस्मानाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेची अधिकृत अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रे सुरु करण्यास परवानगी मिळणेची विनंती केली आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद खालील अटी व शर्तींच्या आधारे उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेची अधिकृत अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रे सुरु करण्यास परवानगी देत आहे.

1. उपरोक्त संदर्भ क्र. 5 मध्ये नमूद भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांचे दि. 08.09.2020 रोजीच्या प्रमाणित कार्यपद्धती (SOP) मधील सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
2. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रामध्ये सामाजिक अंतराचे (6 फूट/2 गज की दूरी) पालन होईल याअनुषंगाने बैठक व्यवस्था करण्यात यावी.
3. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रामध्ये प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थींनी फेस कव्हर, गॉगल्स, मास्क/स्वच्छ रुमाल, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर इ. चा वापर करणे बंधनकारक आहे.
4. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रातील उपकरणांचा वापर करण्यापूर्वी व वापर केल्यानंतर त्यांचे निर्जंतूकीकरण (Sanitization) करण्यात यावे.
5. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्राच्या परिसरात व सार्वजनिक जागी वारंवार स्पर्श केले जाणारे पृष्ठभाग (दरवाजांचे कडी-कोंडे, लिफ्टचे बटन, जिन्यावर लावलेली संरक्षक जाळी (handrail), बाके (benches), स्वच्छतागृहे इ. ची स्वच्छता व नियमित निर्जंतुकीकरण (1 % सोडियम हायपोक्लोराईटचा वापर करुन) करणे अनिवार्य आहे.
6. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्राच्या परिसरामध्ये तसेच विशेषतः प्रसाधनगृहे (lavatories), पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याची ठिकाणे (drinking and hand washing stations/areas) चे ठिकाणी प्रभावीपणे व वारंवार स्वच्छता (sanitization) करण्यात यावी.
7. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रामध्ये कामकाज करणा-या कर्मचा-यांनी नियमितपणे सॅनिटायझरचा वापर करावा तसेच साबणाने हात स्वच्छ धुवावेत.
8. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रामध्ये प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षणादरम्यान डोळे, नाक व तोंडाला स्पर्श करणे कटाक्षाने टाळावे.
9. अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रात प्रवेश देण्यापूर्वी प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांचे थर्मल स्कॅनर व पल्स ऑक्सीमिटरद्वारे तपासणी करावी व नोंदवहीमध्ये त्याबाबतच्या दैनंदिन नोंदी घेण्यात याव्यात.
10. सर्दी, ताप व श्वासोच्छवास घेण्यास त्रास होणे इ. कोवीड-19 ची लक्षणे असलेल्या प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांना अध्ययन (संगणक प्रशिक्षण) केंद्रात प्रवेश देऊ नये.
11. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
12. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 30.09.2020 च्या परिशिष्ट 1 मध्ये नमूद केलेल्या कोव्हीड 19 चे व्यवस्थापनासंदर्भातील राष्ट्रीय सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून लागू होईल.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
6. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
7. प्राचार्य, जिल्हा तंत्र शिक्षण प्रशाला, उस्मानाबाद.
8. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
12. श्री. धनंजय जेवळीकर, जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner